REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 14 | ISSUE - 11 | AUGUST - 2025

# गडचिरोली जिल्ह्यातील कृषी विकासाची सद्यस्थिती व आव्हाने

विपुल रमेश बावणे[१] , डॉ. जे. एम. काकडे[२]
[१]संशोधक
[२]संशोधक मार्गदर्शक, प्राचार्य, खत्री महाविद्यालय तुकुम, चंद्रपूर.

## गोषवारा



भारत हा प्राचीन काळापासून कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. भारतीय संस्कृती, अर्थव्यवस्था आणि ग्रामीण जीवनशैलीचा पाया हा शेती आहे. आजही भारताच्या लोकसंख्येपैकी जवळपास ६० टक्के लोकसंख्या थेट किंवा अप्रत्यक्षपणे शेतीशी संबंधित आहे. देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात शेती व कृषीपूरक व्यवसायांचा मोठा वाटा आहे. अन्नधान्य, कडधान्य तेलबिया, भाजीपाला, फळे, ऊस, कापूस, चहा व कॉफी, मसाले अशा विविध पिकांच्या उत्पादनामुळे भारताला 'कृषिप्रधान देश' अशी उपाधी लाभली आहे. गडचिरोली जिल्ह्यातील कृषी विकासात अनेक आव्हाने आहेत, जसे की पायाभूत सुविधांचा अभाव, वाहतूक व दळणवळणाच्या अडचणी, शेतमालाला योग्य बाजारभाव न मिळणे, आधुनिक तंत्रज्ञान व वैज्ञानिक शेती विषयक माहितीत्ता अभाव व सिंचन प्रकल्पाची कमतरता, कर्जबाजारीपणा आणि हवामान बदलामुळे निर्माण झालेली अनिश्चितता या अडचणी आहेत. याशिवाय आदिवासी व महिला शेतकऱ्यांचा कृषी विकास प्रक्रियेत मर्यादित सहभाग आढळतो. त्यामुळे कृषी विकासाची गती मंदावत आहे.

कृषी विकास केवळ उत्पादन वाढवण्यापुरता मर्यादित नसून, तो ग्रामीण विकास, शेतकऱ्यांचे सामाजिक व आर्थिक उत्पन्न, अन्नसुरक्षा, रोजगार निर्मिती आणि शाश्वत जीवनमान या सर्व घटकांशी निगडित आहे. त्यामुळे गडचिरोली जिल्ह्यातील कृषी विकासाचा अभ्यास करणे गरजेचे आहे. प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये गडचिरोली जिल्ह्यातील कृषी विकासाची सद्यस्थिती व आव्हाने यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**शब्दसंकेत:** कृषी विकास, सिंचन सुविधा, विपणन, रोजगार निर्मिती, कृषीपूरक व्यवसाय.

## प्रस्तावना

भारत हा प्राचीन काळापासून कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. देशातील बहुसंख्य लोकसंख्या शेतीवर अवलंबून असल्यामुळे, भारतीय अर्थव्यवस्था ही शेतीशी निगडीत असल्यामुळे शेतीला 'भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा' असेही संबोधले जाते. भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात (GDP) शेती व कृषीपूरक व्यवसायांचा मोठा वाटा आहे. ग्रामीण जनतेच्या सुमारे ६० ते ६५ टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. विदर्भ हा महाराष्ट्रातील महत्त्वाचे कृषी क्षेत्र असून त्यामध्ये गडचिरोली जिल्ह्याचे एक

वेगळे स्थान आहे. गडचिरोली हा जिल्हा डोंगराळ, वनबहुल आणि आदिवासी लोकसंख्येने व्यापलेला असल्यामुळे येथील कृषी विकासाची गती राज्यातील इतर जिल्ह्याच्या तुलनेत मंद आहे.

गडचिरोली जिल्ह्याची अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेतीवर अवलंबून आहे. धान हे येथील मुख्य पीक असून खरीप हंगामात बहुतांश शेतकरी पावसावर आधारित कडधान्य शेती करतात.
तेलबिया, भाजीपाला तसेच काही प्रमाणात रब्बी पिकांची लागवड केली जाते. सिंचनाची सुविधा अल्प असल्यामुळे शेतीचे स्वरुप अजूनही नैसर्गिक पावसावर अवलंबून आहे. पिकांची उत्पादकता तुलनेने कमी असल्यामुळे गडचिरोली कृषी विकासात शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती कमकुवत राहते. भौगोलिक, सामाजिक व आर्थिक घटकांची मर्यादा प्रकर्षाने जाणवते. कृषी विकासासाठी शासन विविध योजना राबवत असले तरी त्या योजनांची परिणामकारकता अपुरी असल्याचे दिसून येते. उत्पादक कंपन्या, शेतमाल साठवणूक व प्रक्रिया उद्योग शेतकऱ्यांसाठी कर्ज पुरवठा, अनुदाने, पिकविमा, योजना अशा विविध उपक्रमाद्वारे शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु अद्यापही बहुतेक शेतकऱ्यांना या योजनेचा अपेक्षित लाभ मिळालेला नाही.

## संशोधनाची उद्दिष्टे

१. गडचिरोली जिल्ह्यातील कृषी विकासाची सद्यस्थिती अभ्यासणे.
२. कृषी विकासातील प्रमुख अडचणी व आव्हाने शोधणे.

## कृषी विकासाचे सद्यस्थिती

गडचिरोली जिल्हा हा विदर्भ विभागाच्या दक्षिण पूर्व भागात वसलेला असून तो महाराष्ट्रातील कृषी, वनसंपत्ती आणि आदिवासी संस्कृतीसाठी विशेष ओळखला जातो. २६ ऑगस्ट १९८२ रोजी चंद्रपूर जिल्ह्यातून गडचिरोली जिल्हा वेगळा करण्यात आला. भौगोलिक व सामाजिक रचनेमुळे या जिल्ह्यातील शेतीला एक वेगळे स्वरुप लाभले आहे. गडचिरोली जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ सुमारे १४४१२ चौरस किमी असून त्यातील सुमारे ७७ टक्के क्षेत्रफळ वनक्षेत्राखाली आहे. त्यामुळे शेती योग्य क्षेत्र मर्यादित असले तरी ग्रामीण व आदिवासी समाजाचे मुख्य उत्पन्न धान पीक आहे. धान उत्पादनामुळे गडचिरोली जिल्ह्याला 'विदर्भाचे धानाचे कोठार' म्हणूनही संबोधले जाते. गडचिरोली जिल्ह्यातील कृषी प्रामुख्याने पावसावर अवलंबून आहे. वार्षिक १००० पर्जन्यमान साधारण १२०० मी. मी. इतके असते. खरीप हंगाम हा येथील प्रमुख शेती हंगाम असून खरीपात धान, तुर, उडीद, मूग, मका, कडधान्य यांची लागवड मोठ्या प्रमाणावर केलीं जाते. रब्बी हंगामात गहू, हरभरा, ज्वारी अशी पिके घेतली जातात पण सिंचन सुविधांचा अभाव असल्यामुळे त्यांचे प्रमाण कमी आहे. मातीच्या दृष्टीने जिल्ह्यात काळी, गाळमिश्रित व लालसर माती आढळते. कोरडवाहू शेतीत ज्वारी, बाजरी व कडधान्य पिकवली जातात. जिल्ह्यात काही प्रमाणात भाजीपाला व फळबागांची लागवड केली जाते. परंतु ती व्यापारीदृष्ट्या मर्यादित आहे.

गडचिरोली जिल्ह्याची अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेतीवर आधारलेली आहे. धान हे येथील मुख्य पीक असून बहुसंख्य शेतकरी लहान व सीमांत आहेत. जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणावर धानाची खरेदी केली जाते. कृषी पूरक व्यवसाय म्हणून पशुपालन, कुक्कुटपालन, मत्स्यपालन आणि वन उत्पन्न गोळा करणे ही कामे मोठ्या प्रमाणावर केली जातात. वनसंपत्तीमुळे बांबू, तेंदुपत्ता, लाख, मध, महुआ इत्यादीवर आधारित छोटे उद्योग सुरु आहेत. ते शेतकऱ्यांना पूरक रोजगार उपलब्ध करुन देतात.

## कृषी विकाससमोरील प्रमुख आव्हाने

### १. पावसावर अवलंबित्व

गडचिरोली जिल्ह्यातील शेती प्रामुख्याने पावसावर अवलंबून आहे. वार्षिक १००० पर्जन्यमान साधारण १२ मी. मी. असून पावसाचा अनियमितपणा, दुष्काळ आणि अतिवृष्टी यामुळे पिकांचे नुकसान

होते. सिंचनाची अपुरी सोय असल्यामुळे खरीप व रब्बी हंगामातील पिके दोन्हीही जोखमीच्या परिस्थितीत राहतात.

### २. सिंचन सुविधा व पाणी व्यवस्थापन

जिल्ह्यातील सिंचन सुविधा मर्यादित आहे. लहान तलाव विहिरी आणि लघुपाटबंधारे असले तरी संपूर्ण शेतीसाठी पुरेशी नाहीत. जलसंधारणाच्या योजनामुळे सुधारणा होत असली तरी प्रगत तंत्रज्ञानाचा वापर फार कमी प्रमाणात होत आहे.

### ३. लहान व तुकडेमोड जमिनीची समस्या

बहुसंख्य शेतकऱ्याकडे लहान व तुकड्यात विभागलेली जमीन आहे. त्यामुळे आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर कठीण होतो आणि उत्पादन क्षमता कमी राहते.

### ४. बाजारपेठ व विपणन अडचणी

गडचिरोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना उत्पादनाची विक्री करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. दळणवळणाचे साधने अपुरी असल्यामुळे बाजारपेठेपर्यंत दलालावर अवलंबित्व वाढल्यामुळे शेतकऱ्यांना अपेक्षित भाव मिळणे कठीण आहे.

### ५. हवामान बदल व नैसर्गिक आपत्ती

गडचिरोली जिल्हा डोंगराळ असून, हवामानातील बदल पिकांच्या उत्पन्नावर थेट परिणाम करतात. अनियमित पाऊस, उष्णतेची वाढ, दुष्काळ किंवा अतिवृष्टी यामुळे पिक हानी होत राहते. शेतकऱ्याकडे प्रतिकारशक्ती कमी असल्यामुळे तेथील शेती धोक्यात येते.

### ६. तांत्रिक ज्ञान व प्रशिक्षणाचा अभाव

शेतकऱ्यांना आधुनिक शेती पद्धती, बियाणे खतांचे योग्य प्रमाण, कीटकनाशकांचा सुरक्षित वापर याबाबत पुरेसे मार्गदर्शन मिळत नाही. कृषी विज्ञान संस्था व शासकीय संस्था असत्या तरी त्यांचा परिणाम सर्व शेतकऱ्यापर्यंत पोहचत नाही.

### ७. आर्थिक अस्थिरता

लहान शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी असल्यामुळे ते कर्ज घेण्यास भाग पडतात, उत्पादन खर्च, खते, कीटकनाशके व बाजारभावातील चढ.उतार यामुळे आर्थिक अस्थिरता निर्माण होते.

### सारांश

गडचिरोली जिल्ह्यातील कृषी विकासाची सद्यस्थिती पाहिली तर काही सकारात्मक बाबी दिसून येतात. तर काही गंभीर अडचणी कायम आहेत. धान उत्पादन हे जिल्ह्याचे वैशिष्ट्य असून शेतकऱ्यांचे मुख्य उत्पादन त्यावरच अवलंबून आहे. मात्र शेती अजूनही पारंपारिक पद्धतीवर आधारित आहे. सिंचन सुविधा, कमी हवामान बदलामुळे कधी दुष्काळ असल्यामुळे शेती पूर्णपणे पावसावर अवलंबून आहे. तर कधी अतिवृष्टी होत असल्याने उत्पादनात मोठ्या प्रमाणावर चढ.उतार होतात. शासकीय योजनांचा लाभ शेतकऱ्यांना होत असला तरी त्यांची अंमलबजावणी सर्व स्तरावर समान प्रमाणात होत नाही. दळणवळणाच्या व बाजारपेठेच्या मर्यादेमुळे शेतकऱ्याला योग्य भाव मिळण्यात अडचणी येतात. शेतकऱ्यांच्या लहान व तुकड्यात विभागलेल्या जमिनीमुळे यांत्रिकीकरण व आधुनिक शेती पद्धतीचा वापर मर्यादित राहतो ही गडचिरोली जिल्ह्यातील कृषी विकासासाठी अनेक आव्हाने आहेत तसेच पावसावर अवलंबित्व व सिंचनाचा अभाव, लहान जमिनीची तुकडे, बाजारपेठेतील अडचणी हवामान बदल, तांत्रिक

ज्ञानाचा अभाव आणि आर्थिक अस्थिरता या आव्हानांचा सामना करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर शेतकरी संघटनाचा प्रसार, सिंचन सुविचा कृषीपूरक उद्योगांचा विकास व शासकीय योजना प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे.

## संदर्भग्रंथ सूची


१. देशमुख प्रभाकर (१९९०): “भारतीय अर्थव्यवस्था”, पिंपळापुरे ॲड कं, नागपूर.

२. फडणवीस व देशपांडे (२००२): “श्रम अर्थशास्त्र”, पिंपळापुरे ॲड कं, नागपूर.

३. कवीमंडल विजय (१९९६): “कृषी अर्थशास्त्र”, मंगेश प्रकाशन, नागपूर

४. भिसे रामेश्वर (२००९): “कृषी विकासातील बदल”, यश प्रकाशन, अकोला.

५. बोधनकर सुधीर, अलोणी विवेक, कुलकर्णी मृणाल (२०१४): “सामाजिक संशोधन पध्दती”, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

६. सोळुंके आर. एस. (२००३): “महाराष्ट्राची अर्थव्यवस्था”, कौमास पब्लीकेशन, औरंगाबाद.

७. Bhise, V. B. (2007): “Some aspects of agricultural development in Maharashtra”, Mittal Publications, New Delhi.

८. Shinde, S. S., & Pawar, M. S. (2018): “Agriculture and rural development of Maharashtra”, Vidya Prakashan, Pune.

९. Deshmukh, R. R., & Kadam, S. S. (2014): “Agricultural economics in Maharashtra: Theory and practice, Vidarbha Publication, Nagpur.